आर.सी.सी क्र.७९०/२०२५
सरकार विरुध्द. हर्षकुमार
निशाणी क्र.५५/क पुढे चालु...

---

**अभियोग पक्षातर्फे एक पत्र जे हस्ताक्षर तज्ञ यांच्याकडे अभिप्रायसाठी पाठवले होते, ते पत्र सरतपास सुरु झाला त्यावेळी उपलब्ध नव्हते त्यामुळे त्या पत्राच्या शिवाय सरतपास व सर्व आरोपींतर्फे उलटतपास या पत्रासाठी राखुन होता. त्यामुळे या पत्रासाठी फक्त पुन्हा फेर सरतपास.**

---

**पुढील सरतपासणी अभियोग पक्षा करीता साक्षीदार क्र.१ तेजस कुलकर्णी यांचा सरतपास श्रीमती. एम. एस. राऊत सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे द्वारा शपथेवर सुरु...**

**९६.** आरोपी क्र.१ ने बँकेला पाठवलेले पत्र ज्यामध्ये ई–मेल आय.डी.हाताने नमुद केला, dsccch.sambhajinagar@gmail.com हे दिनांक ३०.०८.२०२४ रोजीचे होते, ते जर मला दाखवले तर ते मी ओळखेल. या पत्राबाबत मी माझ्या सरतपासात परिच्छेद क्र.१४ मध्ये सर्व नमुद केलेले आहे. ते हेच पत्र आहे, त्यावर उपसंचालक संजय सबनीस यांची सही आहे. या पत्रावर हाताने ई–मेल आय.डी. नमुद केलेला आहे, तो आरोपी क्र.१ ने नमुद केलेला आहे. सदर पत्रास **नि.क्र.१७४** देण्यात येत आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने पोलीसांनी आमच्या कार्यालयातील कॅश बुक जप्त केले होते. सदर कॅश बुकमध्ये नोंदी हया आरोपी क्र.१ यांच्या हस्ताक्षरात घेतल्या जात होत्या. त्याकरिता हस्ताक्षर तपासणीकामी पोलीसांनी कॅश बुक आमच्या कार्यालयातुन जप्त केले होते. मला ते कॅश बुक दाखवले, ते हेच आहे. सदर कॅश बुकला **नि.क्र.१७५** देण्यात येत आहे. सदरील कॅश बुक हे माझ्याकडुनच पंचनाम्याने जप्त केले असुन त्या पंचनाम्यावर नि.क्र.७१ प्रमाणे माझी सही आहे.

(आरोपी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री. बर्जे यांनी हरकत घेतली की, मुळ फिर्यादमध्ये या साक्षीदाराने असे कुठेही सांगितले नाही की, सदर कॅश बुक हे त्यांच्या समक्ष जप्त केले व आज जे सांगण्यात येत आहे ते सुधारणा आहे व मागील सरतपासात सांगितलेली देखील सुधारणा आहे, त्यामुळे ते कॅश बुक या साक्षीदाराला दाखवता येणार नाही व पुराव्यात स्वीकारता येणार नाही व त्याला निशाणी देता येणार नाही. पुराव्यात आलेली सुधारणा अथवा विरोधात्मक पुरावा हि शाबित करण्याची जी प्रक्रिया आहे तयानुसार अंतीम युक्तीवाद झाल्यानंतर ठरविण्यात येईल.)

**सरतपास संपला.**

**(आरोपीच्या विधिज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास तहकुब.)**

| समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृती. |
|---|---|
| RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Date: 2025.11.24 16:34:03 +0530 | RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Date: 2025.11.24 16:34:09 +0530 |
| ( श्री. आर. एस. जांबोटकर ) | ( श्री. आर. एस. जांबोटकर ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |

दिनांक– २४/११/२०२५